■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २८५ ■ गुरूवार दि.३ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 285 ■ Thursday Dt.3 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# भ्रष्ट शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांचा पुढील अंकात भांडाफोड होणार..!

# बीड जिल्ह्यातील शिक्षक भरतीतील पाचशे कोटींचा घोटाळा पुन्हा चव्हाट्यावर, एसआयटी चौकशीमुळे अनेकांचे धाबे दणाणले?

## पाचशे कोटींच्या शिक्षक भरती घोटाळ्यामध्ये नाना हजारे, भेंडेकर, बेडसकर, राऊत यांचा खूप मोठा हातभार; त्यांनी आर्थिक देवाण-घेवाण मागील काळात केल्याची शिक्षण विभागात चर्चा?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## प्राथमिक शिक्षण विभागातील कार्यालयीन अधीक्षक राऊत यांनी तर बेकायदेशीररित्या खाजगी शिक्षक भरतीमध्ये मोठा पराक्रम केला कोट्यावधी रुपयांचा पराक्रम नागरे नानांच्या मध्यस्थीने झाल्याची चर्चा?

# प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी कार्यालयाच्या बाहेर पैसे गोळा करण्यासाठी केजचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांना ठेवले का?

## भगवान फुलारी यांनी खूप मोठा भ्रष्टाचार करून शासनाच्या तिजोरीवर दरोडा टाकला; बीड जिल्ह्यात अनेक प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार करणारा हा निगरघट्ट शिक्षणाधिकारी?

### कार्यालयीन अधीक्षक राऊत यांनी पदाचा दुरुपयोग करून माहिती अधिकाराचा खून केला; फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्याची इंजि. सादेक इनामदार यांची मागणी?


### शिक्षण विभागातील लिपिक भेंडेकर यांनी तर शिक्षण विभागातील शिक्षक भरती घोटाळ्यातील अनेक फायली मोठी रक्कम घेऊन केले गहाळ, सखोल चौकशी होणे गरजेचे?

### बीडच्या जिल्हा परिषद शिक्षण विभागात मलाईदार टेबल मिळवण्यासाठी राजकीय वरदहस्त्यांचा वापर लाभलेल्या हजारे, बेडस्कर, भेडेकर, राऊत, शिक्षण अधिकारी फुलारीचे आर्थिक वळवळ जमा करून हे शिक्षणात खोडा करणारे फुलारींचे दोन्ही हात म्हणजे हे चार जण?

बीड । प्रतिनिधी

विस्तार अधिकारी नाना हजारे यांची वडवणी पंचायत समिती अंतर्गत गटशिक्षणाधिकारी कार्यालय येथे नियुक्ती असताना दोन वर्षापासून तेथे कार्यालयामध्ये एकदा पण आले नाहीत असे गटविकास अधिकारी नागरगोजे यांनी म्हटले आहे. प्रभारी उपशिक्षणाधिकारी म्हणून मागील दहा वर्षापासून शिक्षणाधिकारी माध्यमिक विभागामध्ये बोगस काम करण्याचा आर्थिक व्यवसाय मांडलेला आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जिथिन रहमान यांनी याप्रकरणी लक्ष घालून ज्या ठिकाणी ज्यांच्या नियुक्ती आहेत त्यांना त्या ठिकाणी तात्काळ पाठवावे, शिक्षक भरती घोटाळ्यामध्ये



नाना हजारे यांचा खूप मोठा हातभार आहे ते सुद्धा यामध्ये आर्थिक देवाण-घेवाण त्यांनी मागील काळात केलेली आहे. या अशा भ्रष्टाचारी कर्मचाऱ्यांना तात्काळ त्यांच्या मूळच्या जागेवर पाठवण्यात यावे अशी मागणी केली जात आहे.

प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी कार्यालयाच्या बाहेर पैसे घेण्यासाठी केजचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर

पान २ वर

### ..या दोन शिक्षण संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस शिक्षक भरती?

बीड येथील राजस्थानी शिक्षण संस्था व चंपावती शिक्षण संस्था या संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात बोगस शिक्षक भरती करण्यात आली आहे. या दोन्ही संस्थेचे दोन दैनिक असून स्वत: संपादक आहेत. ते जे काही शिक्षण विभागात तक्रार करतात त्यांची बदनामी करण्याचे टेंडर त्यांनी घेतला आहे. त्याबाबतच्या चुकीच्या बातम्या प्रसिद्ध करणे तसेच विविध प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या अधिकाऱ्यांच्या फेवरमध्ये बातम्या लावणे व त्यांच्याकडून त्यांच्या शिक्षण संस्थेचा फायदा करून घेणे असे अनेक प्रकार आहेत. अशा प्रसिद्ध माध्यम यांच्यावरती काय विश्वास राहणार अशी चर्चा सुरू आहे.

### खोटे गुन्हे दाखल करून बदनामी करण्याचे षड्यंत्र तरी या प्रकरणात खंडपीठ औरंगाबाद येथे दाद मागणार : इनामदार



शिक्षक भरती घोटाळा प्रकरणांमध्ये तक्रार परत घेण्यासाठी मागील अनेक दिवसापासून सादिक इनामदार यांच्या विरुद्ध खोट्या तक्रारी दाखल करणार आहेत या प्रकरणात पोलिस अधीक्षक बीड मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना यापूर्वीच लेखी स्वरुपात कल्पना देण्यात आली होती काल माहिती अधिकाऱ्याची अपील सुनावणीची तारीख रद्द झाल्यानंतर नंतरची तारीख घेण्यासाठी कार्यालयामध्ये गेल्यानंतर तुम्ही दिलेली शिक्षक भरती घोटाळ्याची तक्रार परत घ्या तुमच्यामुळे शिक्षण विभागाची प्रतिमा मलिन झालेली आहे असे शिक्षण अधिकारी श्रीमती पाटील मॅडम म्हणाल्या तसेच शिक्षणाधिकारी प्राथमिक भगवान फुलारी कार्यालयाने अधीक्षक रंगनाथ राऊत व लिपिक भेंडेकर व प्रभारी गटशिक्षणाधिकारी केज लक्ष्मण बेडस्कर, फुलारी शिक्षणाधिकारी यांचा आर्थिक कारभार बघणारे यांनी मला मागील अनेक दिवसापासून खोट्या गुन्ह्यात अडकवणार आहेत. यापूर्वीही प्रयत्न केला होता परंतु माझ्याकडे त्यांचे सर्व व्हिडिओ पुरावे असल्यामुळे ते माझ्या विरोधात गुन्हा दाखल करू शकले नाहीत व त्यांच्याच कार्यालयातील इतर कर्मचारी व अधिकारी यांनी सांगितला आहे की, आम्ही सादिक इनामदार च्या विरोधात कोणतेही तक्रार देणार नाहीत कारण की, असा प्रकार कार्यालयामध्ये घडलाच नाही. शिक्षणाधिकारी प्राथमिक भगवान फुलारी यांच्या जबाबोटी आमच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आले आहेत. माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी बीड जिल्हा शिक्षक भरती घोटाळा प्रकरणी अधिवेशनामध्ये माझ्या तक्रारी वरती प्रश्न उपस्थित केला. तसेच विधानसभेमध्ये महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी एसआयटी मार्फत चौकशी करण्याची घोषणा केली या सर्व भीतीपोटी व तक्रार परत घेण्यासाठी विविध प्रकारचे प्रयोग करत आहेत. भगवान फुलारी व त्यांच्या कार्यालयातील इतर कर्मचारी यांच्यामार्फत फॉर्च्यूनर मागितल्या प्रकारे बदनामी करत आहेत. यांच्या कोणत्याच आमिषाला बळी न पडल्यामुळे हा प्रकार केला जात आहे. या प्रकरणातील सर्व व्हिडिओचे पुरावे माझ्याकडे उपलब्ध आहेत असा प्रकार घडलाच नाही त्या ठिकाणी माहिती अधिकाऱ्याची अपील ची तारीख २७ जून देण्यात आली होती. परंतु औरंगाबाद येथे महाराष्ट्रातील सर्व शिक्षणाधिकारी उपसंचालक संचालक यांची आढावा बैठक महाराष्ट्र राज्याचे शारीरिक शिक्षण मंत्री दादा भुसे व महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव रणजीत देवल व आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्याकडे शिक्षण विभाग माध्यमिक बीड व प्राथमिक यांच्या बाबत तक्रार दिली व इथले सर्व प्रकरणाची हकीकत सांगितली. या प्रकरणाचा दात धरून माझ्यावरती हा कटकारस्थान रचण्यात आलेला आहे. खोटे गुन्हे दाखल करून बदनामी करण्याचे षडयंत्र आहे तरी या प्रकरणात तात्काळ खंडपीठ औरंगाबाद येथे दाद मागणार असल्याचे सादिक इमानदार यांनी सांगितले.

### नाना नागरे यांनी शिक्षण विभागांमध्ये दुसऱ्याची बदनामी करण्याची सुपारी घेतली?

कोणताही प्रकार न घडता असा घडला म्हणून लोकांसमोर दाखवायचं काम नागरे नाना करतो नागरे नाना हा कंत्राटी कर्मचारी होता. तो वयोमानानुसार रिटायरमेंट झाला नंतर त्याने प्रत्येक गटशिक्षणाधिकाऱ्यांना विस्ताराधिकाऱ्यांना सिविल हॉस्पिटल मध्ये पोलीस अधीक्षक कार्यालय, जिल्हा परिषद, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, समग्र शिक्षा येथील कर्मचाऱ्यांना दाब धडक टाकून जाहिरातीच्या नावाखाली हजार रुपये गोळा करण्याचा यांचा व्यवसाय आहे. हे प्रत्येक कार्यालयामध्ये जाऊन तिथल्या अधिकाऱ्यांना दाबधडप करून किंवा तुमच्या बातम्या लावतो तुम्ही असा असा भ्रष्टाचार केला तुमची अशा प्रकारे माझ्याकडे पुरावे आहेत असे ब्लॅकमेलिंग करण्याचा धंदा हा नाना नागरे यांचा आहे. अशा नागरेला तात्काळ प्रतिबंध घालावा कारण की, त्यांना कार्यालयामध्ये दररोज येण्याचं काय काम आहे. हे कुठलाही कामधंदा न करता फक्त शासकीय कार्यालयाच्या जीवावर यांचे घर चालतात व प्रसिद्ध माध्यमांमध्ये दुसऱ्याच्या बदनामी करण्याचा हे टेंडर घेतात.

### नागरे नानांनी दलाली बंद करावी?

बीड शहरातील तो एक शिक्षक सध्या सेवानिवृत्त झाल्यानंतर पत्रकारिता करतो तो म्हणजे नागरे नाना शिक्षण विभागातील सगळ्यात मोठा आर्थिक जोडीचा दुवा आहे. नाना हा एका भाऊच्या जीवावर दादागिरी करतो आणि त्या भाऊच्या संस्थेची पण जिल्हा परिषद मध्ये शाळेचे सर्व कामे करतो. नागरे नानाला नेमकं जिल्हा परिषद मध्ये आर्थिक तडजोडसाठी फुलारीने ठेवलं का? पोलीस स्टेशन मध्ये सुद्धा नाना उभा असतो आणि नानाचं मत म्हणजे काळ्या दगडावरती पांढरी रेघ आणि नानाच्या अड्डून शिक्षण विभागांमध्ये कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार झालेला आहे. नाना हा जिल्हा परिषद च्या जमिनीवर शिक्षण संस्थेच्या अनेक शेतमालकांचा नांगर उडत आहे. त्यामुळे नानाचा अगोदर बंदोबस्त करणे गरजेचे आहे. पुढील अंकांमध्ये नानाच्या सर्व बाबी वाचकांच्या निदर्शनास येतील आणि नानाचा भांडाफोड होईल. नानाची दुकान शिक्षण विभागात कोणाच्या आशीर्वादाने चालते हे आज राजदोष आहे. बीड शहरातील नामांकित असलेल्या राजस्थान आणि चंपावती या दोन शाळांचा यामध्ये हस्तक्षेप आहे. बीड जिल्ह्यामध्ये ५० पेक्षा जास्त शिक्षण संस्थांमध्ये कोट्यावधी रूपाचा भ्रष्टाचार आणि अनियमित्ता व नियम शिक्षकांची भरती करत कोट्यावधी रूपांचा व्यवहार झालेले आहेत. त्यामुळे आता शिक्षण विभागामध्ये एसआयटी चौकशी शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी अधिवेशनामध्ये घोषणा केल्या शनंतर अनेकांचे धाबे दणाणले आहेत तर आता माजलगावचे आमदार प्रकाश सोळुंके यांचीही या प्रकरणी उडी घेतलेली आहे. आणि नाना म्हणतो टेन्शन घेऊ नका मी आहे भाऊच्या आशीर्वादाने सगळं काही चांगलं करतो. त्यामुळे अगोदर नानाचा गुंडाना आणि नंतरच बाकीच्या पत्रकारांना आणि तक्रारदारांना मॅनेज करा असंही नागरी नाना म्हणतो त्यामुळे नागरे नानांनी दलाली बंद करावी.

## सिरसाळा पोलीस ठाण्याजवळ गोमांस विक्रीवर छापा; ३०-४० किलो मांस जप्त

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा पोलीस ठाण्याच्या अगदी पाठी मागे असलेल्या मदिना नगर परिसरात गोमांस विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकून अंदाजे ३० ते ४० किलो गोमांस जप्त केले आहे. गुरुवारी सकाळी ७ ते ८ वाजण्याच्या सुमारास करण्यात आलेल्या या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, कारवाई होऊनही अद्याप याप्रकरणी कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, कारण जप्त केलेले मांस गोमांस आहे की नाही, हे निश्चित करण्यासाठी



पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अहवालाची प्रतीक्षा केली जात आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सिरसाळा

पान २ वर

## महिलेला मारहाण करत घराचा कडी, कोंडा तोडून ३० हजार लांबविले!

दौलावडगाव । प्रतिनिधी



बुधवारी दुपारच्या दरम्यान घरासमोरील शेतात काम करत असताना येथील एकाच कुटुंबातील चौघांनी येऊन जुन्या भांडणांची कुरापत काढून लाथाबुक्यांनी मारहाण करत, शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देत, बंद घराचा कडी, कोंडा तोडून आत घुसून

पान २ वर

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

## शेतकऱ्यांनी नवे तंत्र आत्मसात करावे : जॉन्सन

गेवराई । प्रतिनिधी

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी, बुधवार ता. ३ रोजी नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांशी हितगुज करून, त्यांच्याशी शैक्षणिक विषयांवर चर्चा करून, त्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान, शेतकऱ्यांनी नवे तंत्र आत्मसात केले पाहिजे. शेतीला पुरक उद्योग उभे केले पाहिजेत, अशी अपेक्षा ही त्यांनी व्यक्त केली आहे. जिल्हाधिकारी



विवेक जॉन्सन यांनी दि. २ जून रोजी गेवराई तालुक्यातील रूई, सिरसदेवी, नवोदय विद्यालय गढी, गेवराई येथे भेटी दिल्या.

रूई येथे रेशीम शेती, उत्पादन, यांस भेटी देऊन रेशीम क्लस्टर डेव्हलपमेंट योजना प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शन केले. जिल्हा परिषद

पान २ वर

# दिव्यांग, ज्येष्ठांना खा. बजरंग सोनवणे यांच्यामुळे मिळणार आधार

## बीड जिल्ह्यात १८ जुलै पासून कृत्रिमसाहित्याचे वाटप, पंचायत समिती स्तरावर शिबीरांचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

दिव्यांग बांधवांना सहानुभूती नव्हे तर भक्कम साथ देऊया! या उदात्त दृष्टीकोनातून खा.बजरंग सोनवणे यांच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन व एलिम्को मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संपुर्ण बीड लोकसभा मतदार संघामध्ये दिव्यांग व्यक्तींना व ज्येष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य/साधने वाटप करण्यात येणार आहेत. दि.१८ जुलै पासून हे शिबीर पंचायत समिती स्तरा वर राबविण्यात येणार आहे.



बीड लोकसभा मतदारसंघातील तालुक्यांमध्ये भव्य पूर्व तपासणी व नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. या शिबिरांचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव, विविध सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देणे, तसेच ज्येष्ठ नागरिकांना राष्ट्रीय वयोश्री योजने अंतर्गत मोफत सहाय्यक उपकरणे प्रदान करणे हा आहे. एलिम्को, मुंबई या केंद्र शासनाच्या अधिकृत संस्थेच्या माध्यमातून दि.१८ जुलै ते ३० जुलै २०२५ या कालावधीत बीड लोकसभा मतदार संघात ही विशेष शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांमध्ये पात्र लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी, नोंदणी प्रक्रिया आणि आवश्यकतेनुसार तात्काळ मोफत कृत्रिम अवयवांचे वाटप केले जाईल. हा उपक्रम दिव्यांग व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी एक मोठा दिलासा ठरणार आहे. या माध्यमातून त्यांना आत्मनिर्भर होण्यास आणि दैनंदिन जीवन सुलभ करण्यास मदत मिळेल.

बीड लोकसभा मतदार संघातील जास्तीतजास्त दिव्यांगबांधवांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी या शिबिरांमध्ये सहभागी होऊन या योजनेचा लाभ घ्यावा. बीड जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांपर्यंत गावचे प्रमूख म्हणून सरपंच आणि गावातील तरूणांनी ही माहिती द्यावी, जेणे करून त्यांना या शिबीराचा लाभ होईल.

**–खा.बजरंग सोनवणे,** बीड लोकसभा मतदार संघ

### बीडीओ असतील नोडल अधिकारी

पुर्व तपासणी शिबीरा साठी संबंधीत पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना दिव्यांग नोडल अधिकारी म्हणुन काम करावयाचे आहे. सदर पूर्व तपासणी शिबीरासाठी बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील कर्मचारी यांना दिव्यांग दूत म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे. मुख्याध्यापक यांच्या नियंत्रणाखाली सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे दिव्यांग दूत म्हणून काम करतील.

### शिबीर कधी व कोठे ? तालुका दिनांक ठिकाण

केज १८ जुलै पंचायत समिती, अंबाजोगाई १९ जुलै, पंचायत समिती
बीड २१ जुलै पंचायत समिती माजलगाव २२ जुलै, पंचायत समिती
पाटोदा २३ जुलै पंचायत समिती वडवणी, २४ जुलै पंचायत समिती
आष्टी २५ जुलै पंचायत समिती धारूर, २६ जुलै पंचायत समिती
परळी २८ जुलै पंचायत समिती
शिरूर २९ जुलै पंचायत समिती, गेवराई ३० जुलै पंचायत समिती.

### तालुकानिहाय दिव्यांग दूत शाळा

केज मतिमंद निवासी विद्यालय, उमरी, मुकबधीर निवासी विद्यालय, उमरी, अस्थिव्यंग निवासी विद्यालय, केज
अंबाजोगाई– ज्ञानवर्धिनी मूकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई योधवधिनी मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई अहिल्यादेवी मुकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई
ज्ञानसागर कर्णबधीर निवासी विद्यालय, जवळगाव सेवा मतिमंद कार्यशाळा, धानोरा.
बीड– आर्युमंगलम निवासी मुकबधीर विद्यालय, बीड
प्रज्ञाचक्षु निवासी अंध विद्यालय, बीड
रुख्माई गोविंद मतिमंद निवासी विद्यालय, पांगरी रोड बीड
मतिमंद निवासी विद्यालय, वासनवाडी अनिवासी मुकबधीर विद्यालय, वासनवाडी.
माजलगांव– मतिमंद निवासी विद्यालय, माजलगांव मुकबधीर निवासी विद्यालय, माजलगांव मतिमंद निवासी विद्यालय, किट्टी आडगाव
मुकबधीर निवासी विद्यालय, किट्टीआडगाव
पाटोदा–मुकबधीर निवासी विद्यालय, तांबाराजुरी मतिमंद निवासी विद्यालय, तांबाराजूरी,
मतिमंद निवासी विद्यालय, दासखेड.
वडवणी– साईनाथ मतिमंद निवासी विद्यालय, नाथापुर मतिमंद निवासी विद्यालय, संभाजी नगर बीड अस्थिव्यंग निवासी विद्यालय, नेकनुर मुकबधीर निवासी विद्यालय,नेकनूर.
आष्टी– छत्रपती शाहू महाराज मुकबधीर निवासी विद्यालय, आष्टी छत्रपती शाहू महाराज अस्थिव्यंग निवासी विद्यालय, आष्टी
श्रेया मतिमंद निवासी विद्यालय, कारखेल,
धारूर– मतिमंद निवासी विद्यालय धारुर अस्थिव्यंग निवासी विद्यालय,धारुर मुकबधीर निवासी विद्यालय, धारुर
मतिमंद निवासी विद्यालय, बीड रोड धारुर.
परळी– मानवविकास मुकबधीर निवासी विद्यालय, अंबाजोगाई मानवविकास मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई मानवविकास अस्थिव्यंग निवासी विद्यालय, अंबाजोगाई मुकबधीर निवासी विद्यालय, परळी कर्तव्य मतिमंद निवासी विद्यालय, अंबाजोगाई मतिमंद निवासी विद्यालय,
शिरुर– मतिमंद निवासी विद्यालय शिरूर, अस्थिव्यंग निवासी विद्यालय तळेगाव, ता.बीड.
गेवराई– अस्थिव्यंग निवासी विद्यालय, तळेगाव ता.जि.बीड के.केशवरावजी धांडे मतिमंद निवासी विद्यालय, तलवाडा ता.गेवराई मतिमंद निवासी विद्यालय, गेवराई प्रौढ मतिमंद निवासी कार्यशाळा, तलवाडा

# मोटार सायकल चोरास अटक, चोरलेल्या सहा मोटार सायकल जप्त

**स्थानिक गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी**

बीड । प्रतिनिधी

बीड मध्ये मोटार सायकल चोरणाऱ्या ईसमांची माहीती काढुन कारवाई करण्यचे सुचना मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाला दिल्या होत्या. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेने दुचाकी चोरी करणाऱ्या ईसमांची माहीती काढण्यासाठी प्रयत्ना करीत असताना रेकॉर्डवरील आरोपी नामे जिवन रामदास गाडे, वय २४ वर्ष, रा बार्शी नाका, बीड यास चोरीची दुचाकीसह पोलीसांनी परळी रोड येथे सापळा लावुन पकडले. आरोपीनामे जिवन रामदास गाडे यास ताब्यात घेवुन तपास केला असता त्याने ईतरही बीड शहरातील व पुण्यामधील मौटार सायकली चोरल्याचे निष्पन झाले. सदर आरोपीकडुन एकुण सहा मोटार सायकली जप्त करण्यात येवुन ३,५०,००० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीस शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे मोटार सायकलच्या गुन्हयात अटक करण्यात आली आहे.



आरोपी नामे जिवन रामदास गाडे याचे कडुन खालील मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.नं ३२१/२०२५ कलम ३०३ (२) बी.एन.एस, पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र. नं १०३/२०२३ कलम ३७९ भा.दं.विधान, पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.नं १९९/२०२३ कलम ३७९ भा.दं.विधान, पोलीस ठाणे चंदननगर, पुणे शहर गु.र.नं २५५/२०२४ कलम ३७९ भा.दं.विधान, पोलीस ठाणे भोसरी गु.र.नं १०३७/२०२३ कलम ३७९ भा.दं.विधान वरील पाच मोटार सायकलचे गुन्हे आरोपी नामे जिवन रामदास गाडे याने केल्याचे कबुली दिली आहे. तसेच ईतर एक मोटार सायकल बाबत कोणताही अभिलेख मिळुन आला नाही. त्या बाबत पोलीस तपास करीत आहे. सदरचा जिवन रामदास गाडे हा यापुर्वी वडवणी पोलीस ठाणे यांनी मोटार सायकल चोरीच्या गुन्हयात अटक केली होती. सदरील कारवाई श्री नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, बीड, श्री शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सिध्देश्वर मुरकुटे, पोलीस हवालदार विकास राठोड, राहुल शिंदे, मनोज परजणे, आशपाक सय्यद, सुनील राठोड यांनी केली आहे.

# हजारो घरकुलांचा घोटाळा करणाऱ्या वादग्रस्त विस्तार अधिकारी सुनिल थोरातला गेवराई पंचायत समितीचा अतिरिक्त कार्यभार देऊ नये

गेवराई । प्रतिनिधी

पंचायत समिती, गेवराई येथील वादग्रस्त हजारो घरकुलाचा घोटाळा करणारे श्री. सुनिल थोरात विस्तार अधिकारी हे दहा वर्षापासून काम करत आहेत. त्यांच्या बाबतीत दहा वर्षामध्ये अनेक तक्रारी आहेत. त्यांनी दहा वर्षामध्ये घरकुलामध्ये काळाबाजार केला आहे व कर्मचारी यांना सतत अट्रॅसिटीच्या धमक्या देत असतात. तसेच महिला व बालकल्याण, गेवराई येथे काम करत असतांना अंगणवाडी ताईंना धमक्या देणे, भरती प्रकरणामध्ये काळाबाजार केला आहे. तेंव्हा त्यांच्या कार्यकाळातील अंगणवाडी भरती प्रक्रियाची तपासणी केल्यास सत्य बाहेर येईल. तसेच आज त्यांची वडवणी येथे बदली झाली आहे.

तरी साहेबांनी पंचायत समिती, गेवराई येथील अतिरिक्त कार्यभार देवू नये. तरी अंगणवाडी ताई, सुपयवायझर यांना मानसिक त्रास देणे, तसेच ग्रामसेवक यांना धमक्या देणे, सरपंचना दबावात घेवून मी सांगेन ते करा नाहीत तर तुमच्यावर अट्रॅसिटी दाखल करेल, तसेच



घरकुलाच्या बाबतीत ग्रामीण भागातून सरपंच, ग्रा.पं. सदस्य, लाभधारक काम घेवून आल्यानंतर आरेरावीची भाषा वापरणे, अमाप पैशाची मागणी करणे, पैसे न दिल्यास तुला बघुन घेईन तू गेवराईला कसा येतोस ते पाहतोच तसेच ग्रामीण भागातील कित्येक लोकांवर ३५३ करण्याचा प्रयत्न, अट्रॅसिटी दाखल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणून गेवराई तालुक्याच्या वतीने मी अशी मागणी करतो की, श्री. थोरात सुनिल, विस्तार अधिकारी यांना गेवराई तालुक्यामध्ये १० वर्षे पूर्ण झालेले असल्यामुळे व त्यांची शासकीय बदली झाल्यामुळे त्यांना परत गेवराई पंचायत समिती येथील विस्तार अधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार देण्यात येवू नये, दिल्यास मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बीड यांच्या कार्यालयासमोर उपोषणास बसण्यात येईल, याची नोंद घ्यावी, अशी विनंती उज्वल महादेव सुतार यांनी केली आहे.,

एका तालुक्यात १० वर्ष कार्यकाळ झाल्या नंतर पुन्हा पदभार देण्याची काय हेवडी घाई आणि शासकीय बदली होऊन सुद्धा पुन्हा गेवराई मध्ये वापस येण्याचा मोह आवरेणा झाला आहे. त्यामुळे सुनील थोरात याच्या कारकीर्द मध्ये झालेल्या हजारो घरकुलाचा घोटाळा उघडकीस आला पाहिजे सुनील थोरात यांना हा संबंधित केलेला घरकुल घोटाळा दाबण्यासाठी पुन्हा एकदा गेवराई पंचायत समितीमध्ये विस्तार अधिकारी म्हणून निवड होऊन पुन्हा एकदा त्यांना अतिरिक्त मिळावा यासाठी त्यांचे प्रयत्न चालू आहेत परंतु आता तरी त्यांना घरकुल घोटाळा आणखीन करण्यासाठी कोणाच्या आशीर्वादाने अतिरिक्त पदभार देण्याचा घाट आहे हे आता गेवराई तालुक्यातील जनतेने विद्यमान शासन करताना विचारले पाहिजे जर वादग्रस्त भ्रष्टाचाराने बरबटलेल्या सुनील थोरात यांना अतिरिक्त पदभार दिला तर गांधीगिरी पद्धतीने आंदोलन करणार असल्याचेही उज्वल भैया सुतार यांनी म्हटले आहे.



बीड जिल्हा माध्यमिक शिक्षण विभाग नुतन शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांचे कार्यालयात यथोचित स्वागत मुप्टा शिक्षक संघटनेच्यावतीने करण्यात आले. बीड जिल्हाध्यक्ष शरदराव मगर, जिल्हासचिव प्रा. शशिकांत जावळे, जिल्हाध्यक्ष (ज्यू) प्रा.नारायण घोलप, जिल्हाध्यक्ष प्रविण तरकसे, तालुकाध्यक्ष प्रा.शेख मसरूर अन्वर आदी उपस्थित होते.

## साईराज काळेचा लातुरात सन्मान

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा गावातील प्रगतशील शेतकरी श्री. व्यंकटेश काळे यांचे चिरंजीव साईराज व्यंकटेश काळे याने वर्ग १० वी लातूर बोर्ड अंतर्गतच्या केशवराज शाळेतून चांगले गुण घेऊन एस संपादन केली आहे. साईराज व्यंकटेश काळे यास ९६.टक्के प्रात झाले आहेत.

त्यांच्या यशाबद्दल आई वडील यांच्या समावेत साईराज काळेचा दयानंद सभागृह लातूर येथे आयोजित केशवराव शैक्षणिक संकुलांच्या ७४ व्या संस्था वर्धापन दिनाच्या औचित्याचे आयोजित कार्यक्रमात पद्मश्री चैत्रानन्नी पवार व मा.आ. अभिमन्यू पवार साहेब यांच्या हस्ते सत्कार व सन्मान करण्यात आला. दरम्यान शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक तसेच पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. साईराज व्यंकटेश काळे हा अत्यंत हुशार व चाणक्य विद्यार्थी आहे. सिरसाळ्यात सर्वत्र शाळेमध्ये सत्कार व सन्मान केले जात आहेत.

# निराधार व वृद्ध महिलांचे प्रश्न सोडवण्यासाठी बीडचे तहसीलदार शेळके व्हिडिओ कॉलवर

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांसाठी शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा म्हणजे शेतरस्ता असतो. परंतु काही अडचणींमुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतातील रस्ता नसल्यामुळे शेतीमाल तसेच दैनंदिन कामकाजासाठी अडचणी निर्माण होऊन भांडणे होतात, असा सार्वत्रिक अनुभव आहे. महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले आहेत. शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करण्यात यावे, त्यासाठी महाराजस्व अभियान राबवावे, मोकळे करून दिलेल्या रस्त्याच्या नोंदी सातबारावर घ्याव्यात, जिवंत सातबारा म्हणजेच सातबारा वरील मयतांची नावे कमी करून वारसांची नावे लावून घ्यावी, याशिवाय सातबारावर असलेल्या अनावश्यक नोंदी कमी करण्यात याव्यात अशा एक ना अनेक गोष्टी महसूल मंत्र्यांनी करून घेण्याचा चंग बांधलेला आहे.

नागरिकांना वाळू ऐवजी कृत्रिम वाळू कशी उपलब्ध होईल यासाठी सुद्धा त्यांचा मोठ्या प्रमाणात पाठपुरावा सुरू आहे. छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर हे सस्ती अदालत योजनेतून शेतकऱ्यांना कमी खर्चातून कसा रस्ता मिळेल यासाठी प्रयत्न करताना दिसत आहेत. त्यासाठी त्यांनी जिल्हाधिकारी यांच्या बैठका घेऊन विविध प्रकारच्या सूचना केल्याची दिसून येते.

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी जिल्हाभरात शेतकऱ्यांप्रती तसेच वृद्ध, दिव्यांग यांच्याप्रती असलेल्या मदत भावनेतून अनेक नवीन उपक्रम सुरू केले. जिल्हाधिकारी स्वतः तालुकास्तरीय बैठका घेऊन महाराजस्व अभियान, छत्रपती शिवाजी महाराज





समाधान शिबिर योजना, फार्मर आयडी काढणे, जिवंत सातबारा मोहिमा राबविणे यासाठी मार्गदर्शन करत आहेत. शिवाय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या कमी कशा होतील यासाठी अनेक वेळा बैठकांमध्ये मार्गदर्शन केले आहे. शेतकऱ्यांना, गावकऱ्यांना अपीलही केलं आहे. बीड जिल्ह्यातील बालविवाहाचे प्रमाण सुद्धा लक्षणीय आहे. यात घट व्हावी म्हणून जिल्हाधिकारी यांनी स्वतः साक्षाळपिंपरी येथे गावकऱ्यांना शपथ दिली होती.

एकंदरीत प्रशासनाच्या या सकारात्मक भूमिकेमुळे तालुकास्तरावरील अधिकारी यांचेही मनोबल वाढलेले दिसून येते. सर्वसामान्य व्यक्ती, नागरिक यांना कमीत कमी त्रास व्हावा, त्यांची कामे प्रधान्याने व्हावीत, लवकरात लवकर व्हावी यासाठी बीड तहसील कार्यालयातील तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, नायब तहसीलदार सुरेंद्र डोके, नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे, नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर व त्यांच्या अधिनस्त कर्मचारी राबतांना दिसत आहे.

सध्या बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अनेक शेतरस्ते, पांदण रस्ते, शिवरस्ते यांचे वाद मिटवून रस्ते मोकळे केले. अश्याच रस्त्यासंदर्भात चाकरवाडी येथील शेतकऱ्यांनी तहसीलदार शेळके यांच्याकडे शेत रस्त्यावरील अतिक्रमण मोकळे करून देण्याची मागणी करण्यासाठी फोन केला असता लगेच व्हिडिओ कॉल करून सर्व शेतकऱ्यांशी बोलून त्यांचे म्हणणे ऐकून घेतले तसेच पुढील कार्यवाही करण्यासाठी संबंधितांना आदेश दिले.

चाकरवाडी येथील संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ अनुदान योजनेमधील काही लाभार्थी दिव्यांग आणि वृद्ध असल्यामुळे डीबीटी करू शकले नाहीत. त्यांची ही अडचण तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना सांगितली असता त्यांची पण अडचण व्हिडिओ कॉल वरूनच दूर केली. लगेच संगायो निराधार विभागामध्ये आदेश देऊन सर्व निराधारांच्या अडचणी सोडवण्याचा आदेश दिले. ई आधार घेऊन येण्यास सांगितले.

पान १ वरून...

### प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी कार्यालयाच्या...

यांना ठेवलेले आहे. ते कार्यालय केजना संभाळता दररोज जिल्हा परिषद इमारती समोर फिरत आहेत. खाजगी शिक्षक भरती घोटाळ्यामध्ये न्यायालयाचा वेगळा संदर्भ देऊन अंशतः अनुदानित वरून शंभर टक्के अनुदानित वरती नियुक्ती तसेच विनाअनुदानित वरून अनुदानित वरती नियुक्ती जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे आधार हे खाजगी शिक्षक संस्थेला प्रत्येकी १५ हजार रुपये प्रमाणे त्यांच्या पोर्टल वरती घेण्यासाठी व शिक्षकांचे पद वाढवण्यासाठी संच मान्यता मध्ये पद वाढवून घेण्यासाठी खूप मोठा बीड जिल्ह्यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे हे सर्व प्रकरण दाबण्यासाठी भगवान फुलारी यांनी खूप मोठा भ्रष्टाचार करून शासनाच्या तिजोरी वरती दरोडा टाकला आहे व स्वतःचे करोडो रुपयांचे बंगले करोडो रुपयाची प्रॉपर्टी असे बीड जिल्ह्यात अनेक प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार करणारा हा निगारघट्ट शिक्षणाधिकारी आहे. शिक्षणाधिकार्यावरती वरिष्ठ कार्यालयाचा कसलंही नियंत्रण नाही. तो मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना सुद्धा घाबरत नाही व तक्रारकर त्यांना अरेरावी करणे त्यांच्या विरोधात खोट्या तक्रारी देणे व तक्रार परत घेण्यासाठी दबाव आणणे तक्रार दाराची बदनामी करून तक्रारदार फॉर्च्यूनर मागतो किंवा चाळीस लाख रुपये मागतो असे सांगून वरिष्ठांची दिशाभूल करणे दुसऱ्यांची प्रतिमा मलिन करणे असा प्रकार शिक्षणाधिकारी प्राथमिक भगवान फुलारी यांचा आहे.

शिक्षण विभाग प्राथमिक मधील कार्यालयीन अधीक्षक रंगनाथ राऊत यांनी तर बेकायदेशीररित्या खाजगी शिक्षक भरण्यामध्ये मोठा पराक्रम केला आहे. त्यांच्या सुद्धा त्या संचिकेवर स्वाक्षरी आहेत तसेच शालेय पोषण आहारामध्ये पेन्शनच्या प्रकरणावरती मेडिकल फायलीवर स्वाक्षऱ्या करण्यासाठी पैशाची मागणी केली जाते. माहिती अधिकारी विभागाचा त्यांच्याकडे कार्यालयाचा पदभार आहे परंतु त्यांना आजपर्यंत कोणालाही माहिती दिलेली नाही. व त्याचे पत्र सुद्धा दिलेलं नाही. यामध्ये त्यांनी पदाचा दुरुपयोग केला आहे. माहिती अधिकाराचा त्यांनी या ठिकाणी खून केलेला आहे अशा कार्यालयीन अधीक्षकावरती सुद्धा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी होत आहे.

तसेच शिक्षण विभागातील लिपिक भेंडेकर यांनी शिक्षण विभागातील शिक्षक भरती घोटाळ्यातील अनेक फायली मोठी रक्कम घेऊन गहाळ केले असल्याची अशी चर्चा आहे. लिपिक भेंडेकर यांनी पाणी पुरावठ्याला असताना करोडो रुपयाचा घोटाळा केलेला आहे. जलजीवन योजनेमध्ये खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला आहे. तसेच खाजगी शिक्षक भरती घोटाळ्याच्या प्रकरणांमध्ये त्याचा खूप मोठा सिंहाचा वाटा आहे. बीडच्या जिल्हा परिषद मलाईदार टेबल मिळवण्यासाठी राजकीय वरदहस्त्यांचा वापर करतात व माझे खूप मोठे हात आहेत लांबपर्यंत असं सांगतो. सर्व पुरावे नष्ट करण्याचं काम कार्यालयीन अधीक्षक रंगनाथ राऊत व लिपिक भेंडेकर हे करत आहेत. यांच्यावर तात्काळ कारवाई होणे गरजेचे आहे.

### सिरसाळा पोलीस ठाण्याजवळ गोमांस विक्रीवर...

पोलीस ठाण्याच्या पाठीमागील मदिना नगर येथील एका ठिकाणी गोमांस विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली सोपोनी गोरखनाथ दहिफळे, पोलीस निरीक्षक आनंद जाधव आणि त्यांच्या पथकातील पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी छापा टाकताच तिथे गोमांस विक्री सुरू असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत तेथे विक्रीसाठी ठेवलेले सुमारे ३० ते ४० किलो मांस जप्त केले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मांस ताब्यात घेतले आहे. मात्र, हे मांस नेमके कोणत्या प्राण्याचे आहे, हे स्पष्ट करण्यासाठी पोलिसांनी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पाचारण केले आहे. पशुवैद्यकीय अधिकारी घटनास्थळी दाखल झाल्यानंतर जप्त केलेल्या मांसाची तपासणी करतील आणि त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच याप्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. तोपर्यंत, अद्याप याप्रकरणी कोणताही गुन्हा (एफआयआर) दाखल करण्यात आलेला नाही.

या घटनेमुळे परिसरात अवैध मांस विक्रीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांच्या या कारवाईचे नागरिकांनी स्वागत केले असून, अशा प्रकारच्या अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचा अहवाल येताच आरोपींविरोधात महाराष्ट्र पशुसंवर्धन (सुधारणा) अधिनियम, १९९५ आणि भारतीय दंड संहिता अंतर्गत गुन्हा दाखल केला जाईल, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

### महिलेला मारहाण करत घराचा कडी, कोंडा तोडून ३० हजार लांबविले!

संसारउपयोगी वस्तुची नासधूस करत घर खर्चासाठी ठेवलेले रोख ३० हजार रूपये घेऊन गेल्याची घटना २ जुलै रोजी दुपारच्या दरम्यान घडली. या प्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आष्टी तालुक्यातील देवळाली (पानाची) येथील कल्पना मुंकूद वेदपाठक या दुपारच्या दरम्यान स्वताच्या घरासमोरील शेतात काम करत असताना येथील चौघांनी त्याच्या घरी घेऊन जुन्या भांडणाची कुरापत काढून लाथा, बुक्यांनी मारहाण करत मला व माझ्या जावाला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देत घराचा कडी, कोंडा तोडून साहित्यांची नासधूस करत घर खर्चासाठी ठेवलेला ३० हजार रूपये घेऊन गेल्याची घटना देवळाली येथे घडली असुन याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात कल्पना मुंकूद वेदपाठक याच्या फिर्यादीवरून संजय शंकर कटके, मंगल संजय कटके, विठ्ठल शंकर कटके, ओंकारेश्वर चांगदेव कटके यांच्यावर अंभोरा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस)३०५(र), ११५(२), ३५२, ३५१(२)३२४(२),३(५) नुसार चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शेतकऱ्यांनी नवे तंत्र आत्मसात करावे : जॉन्सन

प्राथमिक शाळा, ग्रामपंचायत कार्यालय येथे भेटी देऊन ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या. सिरसदेवी येथे भेटी देऊन जलजीवन मिशन ग्रामीण पाणीपुरवठा योजना पाहणी केली. सिरसदेवी येथील मुख्यमंत्री सोलर योजना २.० अंतर्गत काम सुरू असलेल्या ४ मेगावॉट वीजनिर्मिती प्रकल्प केंद्राच्या कामाची पाहणी केली. जवाहर नवोदय विद्यालय गढी येथे भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्याशी संवाद साधला, अडचणी समजावून घेऊन नवोदय विद्यालयातील विद्यार्थी वसतिगृह, भोजन व्यवस्था तपासणी केली. गेवराई येथील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून, त्यांच्याशी संवाद साधला. अडचणी समजावून घेऊन, त्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगितले. डीपीडीसीतून जिल्हा नियोजन मंडळ फंड उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन दिले. विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. शहरातील तहसील कार्यालयात बसून, कामकाजाचा आढावा घेतला.

तहसील कार्यालयातील नूतनीकरण कामाची पहाणी केली. कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य जनतेला अडचणी विचारून घेऊन त्या सोडविण्यासाठी तहसीलदार यांना आदेशीत केले. जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी दिवस भर गेवराई तालुक्यातील विविध ठिकाणी भेटी देऊन पाहणी केली. यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार संदिप खोमणे व विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# ना. पंकजा मुंडेंचा पुढाकार; गडहिंग्लज प्रशासकीय इमारतीला उपलब्ध करून दिली पशुसंवर्धनची जागा, अनेक वर्षांपासूनचा प्रश्न मार्गी

### उपमुख्यमंत्री अजित पवार – ना. पंकजाताई मुंडे यांच्यात बैठक; मंत्री हसन मुश्रीफ यांनी मानले पंकजाताईंचे आभार

मुंबई । प्रतिनिधी

गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) येथील उप विभागीय कार्यालयाच्या जागेचा प्रश्न अखेर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने मार्गी लागला आहे. उप मुख्यमंत्री अजित पवार आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्यात आज झालेल्या बैठकीत पशुसंवर्धन विभागाने त्यांची ७५ आर जमीन यासाठी उपलब्ध करून दिली आहे. दरम्यान या नवीन इमारतीत पशुसंवर्धन विभागाचे देखील स्वतंत्र कार्यालय असणार आहे. दरम्यान मंत्री हसन मुश्रीफ यांनी याबद्दल ना. पंकजाताईंचे आभार मानले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली व ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत आज विधानभवनातील त्यांच्या समिती कक्षात कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी पशुसंवर्धन विभागाची जागा उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ,आमदार आशुतोष काळे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, पशुसंवर्धन विभागाचे सचिव रामास्वामी ए., पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (व्ही.सी.द्वारे) व अन्य संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.



कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज शहरामध्ये मध्यवर्ती ठिकाणी पशुसंवर्धन विभागाची ३.०६ एकर जागा आहे. त्यापैकी ०.७५ हे.आर. जागा पशुसंवर्धन विभागाने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी उपलब्ध करून द्यावी तसेच पशुसंवर्धन विभागाच्या पुनर्रचनेनुसार नवीन तालुका पशुसंवर्धन व दुग्धविकास उपायुक्त या कार्यालयासाठी स्वतंत्र मजला प्रस्तावित बांधकामांमध्ये समाविष्ट करावा, उर्वरित जागा पशुसंवर्धन विभागाकडे ठेवावी असा निर्णय बैठकीत झाला.

गडहिंग्लज हे उपविभागीय कार्यालय असलेले शहर आहे. या ठिकाणी प्रांत कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता, सहकार, कृषी इत्यादी कार्यालय आहेत आणि ती सर्व भाड्याच्या जागेत आहेत. नवीन इमारतीसाठी जागा उपलब्ध नव्हती. ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने ती आता पशुसंवर्धन विभागाने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्यामुळे शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सर्व महत्त्वाच्या विभागांच्या कार्यालयासाठी एकत्र प्रशासकीय इमारत बांधणे शक्य होणार आहे. त्यासाठी आवश्यक निधी देण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

मुश्रीफ यांनी मानले पंकजा मुंडेंचे आभार

प्रशासकीय इमारतीला पशुसंवर्धन विभागाची जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासूनचा हा प्रश्न आता मार्गी लागल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

## बीड मौलाना आझाद महामंडळात कर्मचाऱ्यांनी लाखोंचा भ्रष्टाचार करून मालामाल झाले : प्रा. सापनकर

बीड । प्रतिनिधी

मौलाना आझाद व अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे गंभीर प्रकार समोर आला आहे. शासनाने अल्पसंख्यांक व आर्थिक दुर्बळ घटकासाठी कर्ज पुरवठा योजना स्थापन केली आहे. या महामंडळातील काही कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी आपल्या घरातील नातेवाईक व मित्र कंपनींना कर्ज दिले आहे शासकीय कर्मचारी कागदपत्रे प्रक्रियेचा आधार न घेता अपूर्ण कागदपत्रांच्या आधारे या योजनेचा लाभ घेताला आहे. गोरगरीब गरजूंना डावलून स्वतःचा खिशा भरण्यासाठी या कर्मचाऱ्यांने नातेवाईकांना सर्रास कर्ज मंजूर करून दिले आहे.

गोरगरिबांच्या हक्का वर गदा आणला आहे. मौलाना आझाद महामंडळात अनेक अल्पसंख्यांक गरजू आणि आर्थिक दुर्बल घटकांतील नागरिकांना कर्ज दिले जात नाही. गोरगरिबांना कर्ज घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कागदपत्राची मागणी केली जाते व खऱ्या गरजूंना डावलून कोट्याधीश रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे. हा प्रकार राज्याचे अल्पसंख्यांक मंत्री दत्तात्रय भरणे साहेब यांच्याकडे भ्रष्टाचारी अधिकारी यांची चौकशी झाली पाहिजे व बीड जिल्ह्यातील मौलाना आझाद महामंडळातील कर्जवाटप झाले आहे मात्र संबंधित राहिली दस्तऐवज आणि रेकॉर्ड गायब केले आहे. कर्ज वाटप करणारी अधिकारी ने आपल्या नातेवाईकांना प्राधान्य दिले आहे. खऱ्या गरजूंना कर्ज दिले जात नाही.

मौलाना आझाद महामंडळाच्या घोटाळ्याची चौकशी झाली पाहिजे नसता जिल्हाधिकारी साहेबांना भेटून निवेदन देण्यात आले आहे. लवकरच या प्रकरणाची चौकशी योग्य रित्या करू, असं आश्वासन दिले आहे नसता आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही असा इशारा राष्ट्रीय समाज पक्षाचे बीड अध्यक्ष प्रा. सापनकर यांनी दिला आहे.

## आदिवासी पारधी ढोर नाय माणूस हाय, माणुसकीची भीक नको हक्क हवा : श्रमिक मानवाधिकार संघ

कळंब । प्रतिनिधी

पानगाव ता.कळंब जिल्हा धाराशिव येथे आदिवासी पारधी समाजावर मासिक व ग्रामसभेचा ठराव घेऊन सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला आहे या सामाजिक बहिष्कारच्या विरोधात श्रमिक मानवाधिकार संघाच्या वतीने आदिवासी पारधी ढोर नाय माणूस हाय, त्यांना माणुसकीची भीक नको हक्क हवा या सत्याग्रहाचे आंदोलन ०८ जुलै २०२५ रोजी पंचायत समिती व उपविभागीय अधिकारी कार्यालय कळंब येथे करण्यात येणार असल्याबाबदचे निवेदन श्रमिक मानवाधिकार संघाचे प्रमुख भाई बजरंग भाऊ ताटे, मानव अधिकार रक्षक सचिव माया शिंदे यांनी गट विकास अधिकारी उपविभागी अधिकारी कळंब जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

सदरील निवेदनात म्हटले आहे, की पानगाव तालुका कळंब ग्रामपंचायत अधिकारी एस.एन देशमाने, सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य यांनी दि २७ मे २०२५ रोजी मासिक सभा व दिनांक २९ जून २०२५ रोजी ग्रामसभा घेऊन आदिवासी पारधी समाजातील कुटुंबाच्या मानवी हक्क मूलभूत अधिकाराच्या विरोधात व संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, या मूल्याविरोधात मासिक, ग्रामसभा ,घेऊन आदिवासी पारधी समाजावर



सामाजिक बहिष्कार टाकून अन्याय केला आहे, गेल्या वर्षी गावकऱ्यांमध्ये आदिवासी पारधी समाजामध्ये वाद झाला होता, तेव्हा आदिवासी पारधी समाजाची राहते घर, मोटरसायकल, चार चाकी वाहने, जीवन उपयोगी वस्तू, साहित्य, गावकऱ्यांनी पेट्रोल ओतून पेटवून देऊन फार मोठे नुकसान केले होते, या घटनेबाबत पोलीस ठाणे येरमाळा येथे गुन्हे नोंद झालेले आहेत. हे सर्व ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत, प्रशासन, यांना माहीत असताना देखील संविधान विरोधी, मानवी हक्क विरोधी, मासिक सभा व ग्रामसभा घेऊन सामाजिक बहिष्कार टाकला आहे. सामाजिक बहिष्कार टाकलेला ठराव गट विकास अधिकारी, तहसीलदार कळंब यांना कारवाईसाठी सादर केला आहे.

ठरावावर गटविकास अधिकारी यांनी कोणतीच कारवाई अद्याप केलेली नाही, मासिक सभा व ग्रामसभा घेऊन पारधी समाजाबद्दलचा दृष्टिकोन सकारात्मक न ठेवता दोष बुद्धीने नकारात्मक दृष्टिकोन ठेवून ठराव घेऊन दाखल केला आहे. तरी समिती नेमून, आदिवासी पारधी समाजाला मानवी हक्क, मूलभूत सुविधा, देण्यात याव्यात पानगाव ग्रामपंचायत बरखास्त करण्यात यावी, संविधान विरोधी व मूलभूत हक्क विरोधी ठराव घेणारे मासिक ग्रामसभा सभेतील उपस्थित ग्रामपंचायत सदस्या यांना पदावरून काढून टाकण्यात यावे, ग्रामपंचायत अधिकारी यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात यावा, कर्तव्यात कामात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यावर गुन्हे नोंद करण्यात यावीत अशा विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनातील मागण्या मंजूर नाही झाल्या तर दिनांक ०९ जुलै २०२५ रोजी पंचायत समिती, उपविभागीय अधिकारी कार्यालय कळंब समोर आदिवासी पारधी ढोरं नाय माणूस हाय, माणूसकीची भीक नको, हक्क हवा हक्क हवा सत्याग्रह करण्यात येणार असल्याचे निवेदन श्रमिक मानवाधिकार संघाचे भाई बजरंग भाऊ, साठे मानव अधिकार रक्षक सचिव माया शिंदे, आदिवासी पारधी समाजाच्या सुनीता भारत चव्हाण, सारिका दशरथ पवार, रेशमा दशरथ पवार, दिगंबर नारायण पवार, नारायण लक्ष्मण पवार, बंडू बाई अरुण पवार, भारत चव्हाण रविराज भारत चव्हाण, अश्विनी रविराज चव्हाण, जयश्री पवार यांच्या देण्यात आलेल्या निवेदनावर सह्या आहेत.

## गुरुआनंद महिला प्रतिष्ठाणतर्फे विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप

### सौ. सिमा ओस्तवाल याचं कौतुक करावे तेवढे कमीच





बीड । प्रतिनिधी

येथील गुरुआनंद महिला प्रतिष्ठाणतर्फे बीड तालुका व गेवराई तालुक्यातील विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात येत आहे. हा उपक्रम पुढील दोन महिने चालू राहणार आहे. यात जवळपास ४० ते ५० शाळांचा समावेश आहे. बऱ्याच उर्दू शाळांचाही यात समावेश करण्यात आला आहे.

गुरुआनंद महिला प्रतिष्ठाणतर्फे हा उपक्रम गेल्या चार वर्षापासून चालू आहे. यावर्षी वाटप करण्यात येणाऱ्या साहित्यात १ लाख २५ हजार वह्या, १२ हजार खूडरबर, २५ हजार शीसपेन्सील, २५ हजार पेन, ११ हजार डिजिटल पाट्या, ५ वी ते १० वील विद्यार्थ्यांना प्रत्येकी चार रजिस्टर यांचा समावेश आहे, अशी माहिती गुरुआनंद महिला प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा सौ. सीमा ओस्तवाल यांनी दिली आहे.

हजारो गोरगरिबांच्या लेकरांना शिक्षणाची आवड निर्माण करून देणाऱ्या बीडच्या सामाजिक कार्यकर्त्यां सौ सीमाताई ओस्तवाल यांच्या कार्याचं कौतुक सर्व स्तरात होत आहे. सीमाताई वस्तू वाले १८ पगड जातीतील धर्मातील हिंदी उर्दू मराठी ज्याकी शाळा ग्रामीण भागामध्ये आता फक्त बोटावर मोजण्याचे विद्यार्थी आता या शाळेमध्ये राहिलेले आहेत या शाळेमध्ये जिल्हा परिषद महाराष्ट्र शासन तर्फे येणाऱ्या निधी हा भ्रष्टाचाराने बरबटलेल्या गुत्तेदार नेते आणि राज्यकर्त्यांच्या घशात जातो या शाळेमध्ये वह्या पुस्तक पेन व शालेय साहित्य वाटून सीमा ओस्तवालानी एक आदर्श निर्माण केला आहे. यामध्ये सौसीमा ओस्तवाल या एका आईच्या भूमिकेमध्ये आहेत. सीमा ओसवालानी आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना साहित्य वाटप करून विद्यार्थी हे शिक्षणाच्या प्रभावामध्ये ओढले असून येणाऱ्या काळामध्ये हेच विद्यार्थी अधिकारी व्हावेत हीच इच्छा सीमा वस्तू वाल्यांची आहे गोरगरिबांच्या लेकरांना कुठे जर शालेय शिक्षणासाठी मदत लागली तर सीमा ओस्तवाल वाल्यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन यावेळी सीमा वस्तुमान व आनंद गुरु महिला प्रतिष्ठानच्या वतीने आवाहन करण्यात आलेले आहे.

## आदित्य कृषि महाविद्यालयाच्या कृषीदुतांकडून अंथरवन पिंपरी येथे कृषीदिनानिमित्त वृक्ष लागवड



बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्नित व आदित्य शिक्षण संस्था, बीड संचलित आदित्य कृषि महाविद्यालयाचे कृषीदूत सुनील मदने, बाबासाहेब पल्हाळ, सचिन धुमाळ, गणेश ढोले, दयानंद सिरसट, योगेश मोरे, रेहान सय्यद, संदीप करडकर, श्रीदीप वळेकर, धीरज पवार, चैतन्य पाटील यांनी ग्रामीण जागरूकता कार्यानुभव २०२५–२६ अंतर्गत अंथरवन पिंपरी गावात ०१ जुलै रोजी कृषी दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंथरून पिंपरी येथील विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीने झाली.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा हरित क्रांतीचे जनक वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांचे कृषी क्षेत्रातील क्रांतिकारी योगदान यांविषयी कृषीदुतांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर कृषी दिनाची पार्श्वभूमी, कृषी दिनाचे महत्त्व आणि कृषिप्रधान देशात कृषी दिन एक पावन पर्व म्हणून का ओळखला जातो या संदर्भात माहिती दिली. कृषी दिनानिमित्त कृषी दुतांकडून गावामध्ये वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषी दुतांनी गावकऱ्यांना वृक्ष लागवडीचे महत्त्व पटवून दिले तसेच झाडे लावा झाडे जगवा हा संदेश दिला. या कार्यक्रमासाठी अंथरवन पिंपरी गावचे सरपंच शिवगंगा भाऊराव प्रभाळे उपसरपंच अशोक बन्सीधर शिंदे कृषी सहाय्यक ज्योती शिंदे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंथरवन पिंपरी चे मुख्याध्यापक राजकुमार थोरात, इतर शिक्षक वर्ग व ग्रामस्थ उपस्थित होते.

कृषी दूतांच्या या अभ्यास दौऱ्यास विद्यार्थ्यांना आदित्य शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ. आदितीजी सारडा मॅडम, आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य कल्याण अपेट, प्राचार्य श्याम भुतडा, कार्यक्रम समन्वयक प्रा. वैभव शिंदे, कार्यक्रम अधिकारी डॉ. धनंजय सातपुते व महाविद्यालयाचे इतर प्राध्यापक वर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

## श्रीमती किरण चौरे आज बीड आकाशवाणीवर

बीड । प्रतिनिधी



येथील यशवंत विध्यालयातील आदर्श उपक्रमशील शिक्षिका श्रीम किरण शेषराव चैरे (पाटोळे) यांचे बीड आकाशवाणी केंद्रावर दि.४ जूलै २०२५ शुक्रवार रोजी सकाळी ठिक ११:०० वा. महिला विश्व या सदरात 'हुंडा प्रथाएक सामाजिक कलंक' या ज्वलंत विषयावर विचार प्रसारित होत आहेत त्याचा श्रोत्यांनी लाभ घ्यावा.

आज समाजात हुंडा प्रथेमुळे, विवह संस्था आडचणित येत आसून, अनेक सामाजिक समस्या निर्माण होत आहेत आणि त्या समस्यांचे दिर्घकालीन परिणाम समाजाला सोसावे लागतात. असे विचार त्यांनी सांगितले आहेत. त्यांच्या उपक्रमाबद्दल जेष्ठ शिक्षक नेते उत्तम पवार, रवींद्र दळवी, शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ, सचिव नामदेव वाघ, मुख्याध्यापक धुमाळ सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.



आष्टी : सेवानिवृत्त सुभेदार रामहरी गंगाधर बर्डे यांचा सेवानिवृत्त कार्यक्रम मोठ्या उत्साहात कारखेल येथील संपन्न झाला. डीजेचे वाद्यात त्यांची गावातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सामाजिक राजकीय क्षेत्रातीलमान्यवर गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पीएमश्री जि.प.माध्यमिक शाळा भोगलवाडी येथे बालविवाह निर्मूलन जनजागृती कार्यक्रम उत्साहात

### जिल्हा प्रशासन व मनस्विनी महिला विकास सेवाभावी संस्थेचा अभिनव उपक्रम!

भोगलवाडी । प्रतिनिधी

पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत जिल्हा प्रशासन व मनस्विनी महिला विकास सेवाभावी संस्था अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह निर्मूलन जनजागृती टप्पा क्रमांक १ विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम दि.१ जुलै २०२५ वार मंगळवार रोजी सादर करण्यात आला. संबंधित संस्थेच्या स्वयंसेविका श्रीम.नेमाटे मॅडम यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

याबाबतची अधिक माहिती अशी की, बालविवाह रोखण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना केल्या असल्या तरी सद्यस्थितीमध्ये कुठे ना कुठेतरी बालविवाह झाल्याच्या घटना आपण पाहत आहोत. परंतु याला आळा बसण्यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे. शासनाच्या उपक्रमानुसार आता त्यांच्यासोबत स्वयंसेवी संस्था पुढे येत आहेत. धारूर तालुक्यातील भोगलवाडी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत नुकताच बालविवाह निर्मूलन जनजागृती



कार्यक्रम सादर करण्यात आला.

यावेळी संबंधित संस्थेच्या स्वयंसेविका श्रीमती नेमाटे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मुलगी असेल तर १८ वर्षाच्या आत व मुलगा असेल तर २१ वर्षाच्या आत कोणीही बालविवाह करणार नाही असे समुपदेशन केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून व विविध कलाकृती मधून शाळेतील इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन कार्यक्रमाचे सादरीकरण केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती साळुंके मॅडम होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून भोगलवाडी येथील पोलीस पाटील श्रीमती कौशल्यताई मुंडे ह्या होत्या. तर भोगलवाडी येथील सर्व अंगणवाडी ताई, मदतनीस, आशा वर्कर यांची विशेष उपस्थिती लाभली. स्वयंसेविका श्रीमती नेमाटे मॅडम यांनी खेळीमेळीने सर्व विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन बालविवाह निर्मूलन जनजागृती कार्यक्रमाचे अति उत्कृष्ट सादरीकरण केले. तसेच लवकरच पालकाकरिता दुसरे उद्बोधन सत्र आयोजित केले जाणार असल्याची माहिती दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका श्रीमती गौळण घुगे मॅडम, शिक्षक सर्व श्री वैजनाथ बडे सर, सूर्यकांत खडके सर, संजय मारकवाड सर, संतोष कांडनगिरे सर, हनुमंत लांब सर, बाळासाहेब करडकर सर, श्रीमती गौळण घुगे मॅडम आणि सेविका श्रीमती छाया जाधव मॅडम यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत मुख्याध्यापिका श्रीमती हेमा साळुंके मॅडम यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन आणि आभार श्री एस. एस.बडे सर यांनी व्यक्त केले. बालविवाह प्रतिबंधात्मक प्रतिज्ञाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## राजेंद्र सोनवणे यांचा सेवानिवृत्ती सोहळा उत्साहात संपन्न

केज । प्रतिनिधी

राजेंद्र सोनवणे सर यांचा सेवानिवृत्ती सोहळा अत्यंत उत्साहात आणि स्नेहभावनेत साजरा करण्यात आला. दीर्घकाळ सार्वजनिक सेवेत कार्यरत असलेल्या सोनवणे सर यांनी आपल्या कार्यकाळात प्रामाणिकपणा, सचोटी आणि लोकाभिमुख दृष्टिकोन यामुळे सहकाऱ्यांमध्ये व समाजात विशेष स्थान निर्माण केले होते. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतोष अर्जुनराव कांदे (अध्यक्ष, शा.व्य.समिती, तांबवा) होते, प्रमुख पाहुणे म्हणून लक्ष्मण बेडस्कर (गटशिक्षणाधिकारी), सौ. दिपालीताई अरुण चाटे (सरपंच, ग्रा.पं. तांबवा) मिराताई अनिल चाटे (उपसरपंच ग्रा.पं. तांबवा) तसेच मुख्याध्यापक नेहरकर सर, मुख्याध्यापक आश्रूबा सोनवणे सर, चाटे मच्छिंद्र



सर, शिंदे मॅडम, गुजर मॅडम, औताडे मॅडम, खरबड मॅडम, बालासाहेब चाटे सर, अशोक चाटे सर, गळगटे सर, अनेक सहकारी, मित्र, कुटुंबीय व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सातवीच्या विद्यार्थीनी पंकजा चाटे, भारती चाटे यांनी देखील भाषण केले उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून राजेंद्र सोनवणे सर यांच्या कार्यपद्धतीचे, शिस्तप्रियतेचे आणि सामाजिक बांधिलकीचे मनापासून कौतुक केले.

सोनवणे सर यांनी आपल्या उत्तरार्धातील भाषणात सर्व सहकाऱ्यांचे, वरिष्ठांचे व कुटुंबियांचे आभार मानले. त्यांनी सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक कार्यात सक्रिय राहण्याची इच्छा व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हजारे सर, प्रास्ताविक संजय चवरे सर यांनी केले. मनोगत गटशिक्षणाधिकारी श्री. लक्ष्मणराव बेडसकर, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री.दत्तात्रय चाटे आबा यांनी व्यक्त केले आभार प्रदर्शन श्री दत्तात्रय चाटे सर यांनी केले. स्वमनोगत राजेंद्र सोनवणे सर यांनी केले. संपूर्ण सोहळा आनंदमय वातावरणात पार पडला.

# धारूरकरांनो उघडा डोळे बघा नीट! तुमच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर रस्त्यासाठी आलेला निधी अखेर जाणार पाण्यात?

■ गुत्तेदाराचं चॅलेंज! जनतेसमोर ओपन बोगस काम चालू? ■ जनतेची मागणी; जिल्हाधिकारी साहेब धारूरच्या रस्त्याची पाहणी कराच! ■ क्वॉलिटी कंट्रोल विभागाकडून चौकशी करा: मग होईल दूध का दूध पाणी का पाणी ■ बांधकाम विभाग व संबंधित अधिकारी यांची गुत्तेदाराशी मिली भगत!








बीड | प्रतिनिधी

धारूरकरांनी मोठ्या प्रमाणात त्रास सहन केल्यानंतर आता शहरातील मुख्य बाजारपेठ रस्त्यांचे काम सुरू झाले आहे. शहरातील रस्त्याच्या विकासकामांना सुरुवात झाली आहे. परंतु, या कामांचा दर्जा निकृष्ट असून, त्यात भ्रष्टाचार होत असल्याची नागरिकांमध्ये चालू आहे. गुत्तेदाराची हात मिळवणे केली असल्यामुळे याकडे बांधकाम विभाग तसेच संबंधित अधिकारी लक्ष देत नसल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी धारूर मुख्य बाजारपेठेच्या होत असलेल्या रस्त्याच्या कामाची पाहणी करून कारवाई करण्याची तसेच रस्त्याच्या बांधकामाची क्वालिटी कंट्रोल विभागाकडून चौकशी करण्याची मागणी नागरिक करत आहे. धारूर शहरांमध्ये व्यापारी नागरिकांच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर छत्रपती शिवाजी महाराज, चौक काशिनाथ चौक, तसेच हनुमान मंदिराकडे जाणारा मुख्य रस्त्याचे काम सध्याला सुरू आहे.पहिलाच डांबरी रस्त्याला टोकरून त्यावर खडी चा थर देऊन व त्यावर सिमेंटचा थर देऊन रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे. परिणामी, रस्त्याचे काम निकृष्ट होत आहे, असे नागरिकांचे म्हणणे आहे. सामाजिक कार्यकर्ते यावर चुप्पी साधून असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सिमेंट काँक्रीटचा रस्ता तयार करताना प्रथम आवश्यक ते खोदकाम करून त्यामध्ये चार इंच जाडीच्या दगडांचा अर्धा फूट थर टाकून त्यावर थोडा मुरूम टाकून रोड रोलरने दबाई करावी लागते. नंतर त्यावर सिमेंट काँक्रिटीकरणाचा थर टाकण्यात येतो, परंतु, असे करताच गुत्तेदाराने चक्क डांबरीकरणाचा रस्ता पूर्ण खोदला त्यातून निघालेले मटेरियल पुन्हा त्यातच वापरण्यात आले. या प्रकरणात भ्रष्टाचार झाला आहे. त्याची चौकशी करून संबंधित गुत्तेदारसहीत अभियंत्यावर कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली असून ते खोदकाम करून त्यामध्ये चार इंच जाडीच्या दगडांचा अर्धा फूट थर टाकून त्यावर थोडा मुरूम टाकून रोड रोलरने दबाई करावी लागते. नंतर त्यावर सिमेंट काँक्रिटीकरणाचा थर टाकण्यात येतो, परंतु, असेन करता, पहिल्या डांबरी रस्त्याला टोकरून, खोदकाम न करता माती मिश्रित कपचीचा वापर करण्यात येत आहे, हा सर्व प्रकार बांधकाम विभागामधील उपअभियंता सचिन कांबळे, इंजि. अरुण मुंडे, नगर परिषदेचे मुख्य अधिकारी यांना माहित असताना, त्यांना होत असलेला बोगस रस्ता डोळ्यात माती गेल्यामुळे दिसना की काय ? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. रात्रीच्या अंधारात गुत्तेदाराने काम उरकण्याचा सपाटा लावला आहे. यामुळे रस्त्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे नागरिकांमधून बोलले जातात आहे. शहरातील मुख्य बाजारपेठेतील रस्त्यांचे काम सुरू झाले आहे. शहरातील रस्त्याच्या विकासकामांना सुरुवात झाली आहे. परंतु, या कामांचा दर्जा निकृष्ट असून, त्यात भ्रष्टाचार होत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा चालू आहे. धारूर शहरांमध्ये व्यापारी नागरिकांच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक, काशिनाथ चौक, तसेच हनुमान मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे काम सध्या सुरू आहे. पहिल्याच डांबरी रस्त्याला टोकरून त्यावर माती मिश्रित कपचीचा वापर करण्यात येत आहे. परिणामी, रस्त्याचे काम निकृष्ट होत आहे, असे नागरिकांतून बोलले जात असून संबंधित गुत्तेदारसह अभियंता, इंजिनीयर यांच्यावर कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

### तो इंजिनीयर कोण कळायलाच मार्ग नाही ? कामाकडे कधी येतो अन् कधी जातो कोणालाच माहीत नाही

शहरातल्या मुख्य रस्त्याचे काम निव्वळ बोगस चालू असून शहरातल्या नागरिकांना अशा असून काम उत्कृष्ट दर्जाचे होणे असताना कामात किती कोणी टक्केवारी घेतली याची चर्चा मात्र मोठ्या प्रमाणात शहरात होऊ लागली याच टक्केवारीत संबंधित इंजिनीयर सहभागी आहे की काय हे मात्र समजायला मार्ग नाही कारण मुख्य रस्त्याचे काम चालू अनेक दिवसापासून चालू असून या कामाकडे तो संबंधित इंजिनियर कोण आहे हे कोणालाच माहीत नसून अन् तो इंजिनीयर कामाकडे कधी येतो अन् कधी जातो कोणालाच माहीत नाहीय असे असताना देखील अधिकारी वर्ग बिंदास पाठ फिरवतात यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांची वचक नाहीये का अशे प्रश्न उपस्थित होत आहेत.

### आर.टी.एल. लेव्हल प्रमाणे दीड फुटाचे खोदकाम बंधनकारक असून खोदकाम नाहीच

धारूर शहरामध्ये होत असलेल्या सिमेंट आर टी एल लेव्हल प्रमाणे चढ उतार नुसार खोदकाम करून पून्हा भरई करून काम करणे असे नियमानुसार दाखवते परंतु धारूर शहरात जो रस्ता होत आहे त्या रस्त्यावर कुठेही खोदकाम झाले नसून किंव्हा होत असताना दिसून येत नाही करोडे रुपयाचे काम असताना आणि शहरातील वाहतुकीसाठी दीर्घ काळ चालणारा रस्ता असा होत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मात्र गप्प दिसून येत आहेत हे काम सुरु असताना बांधकाम विभागाचा अधिकारी कामाकडे फिरकत पण नाही धारूर शहरातून मुख्य रस्ता च्या सिमेंट रोड चे काम होत नियमावली नुसार काम करण्यात येत नाही. आर टी लेव्हल प्रमाणे रस्तादीड फूट खोल करून पुन्हा त्यात भराई करणे आवश्यक असताना सबंधितगुत्तेदारकडुन फक्त काम करत असताना फक्त मागील रस्ता जी सी बी द्वारे वरचे वर उकरून पुन्हा त्यावर खडी टाकून दाबाई करण्यात येत आहे या बाबत बांधकाम विभागचे अधिकारी मात्र गप गार का आहेत हेच कळत नाही.

### धारूर सां.बा.उप विभागाचे उपविभागीय अभियंता सचिन कांबळे तर फोन उचलायला तयार नाहीत

शहरातल्या मुख्य बाजारपेठेतील नव्या रस्त्याच्या चालू असलेल्या कामाकडे संबंधित अधिकाऱ्याला गुत्तेदारांनी कमिशन देऊन मुख्य बाजारपेठेतील रस्त्याचे काम थातुरमातुर करत असल्याचे नागरिकांमध्ये बोलले जात आहे. असे असताना धारूर सा. बा. विभागाचे उपविभागीय अभियंता सचिन कांबळे हे व शहर बांधकाम विभागाचे अधिकारी चालू कामाकडे एकदाही लक्ष देण्यासाठी आले नसल्याने त्या अधिकाऱ्यांना शहरांतील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकारांनी अनेक वेळा फोन केला मात्र सचिन कांबळे नावाचे अधिकारी फोन उचलायला तयार नाहीत जर उपविभागीय अभियंता संबंधित अधिकारी कामाकडे दुर्लक्ष करत असतील तर त्यांचे आणि गुत्तेदार याचे काय देणे घेणे झाले की का असे अनेकानेक प्रश्न उपस्थित होत आहे.

### चालू कामात कोणाला ही हस्तक्षेप करणाऱ्यांना देतायत दम – नागरिक

शहरातला मुख्य रस्त्याचे काम उत्कृष्ट होणे अत्यंत गरजेचे असून शहरातला हा मुख्य रस्तअसल्यामुळे चांगले काम होणे गरजेचे आहे परंतु तसे न होता निव्वळ नित्कृष्ट दर्जाचे काम चालू आहे मात्र या होत असलेल्या बोगस कामाच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी शहरातले अनेक पुढारी राजकीय नेते,समाजसेवक, अनेक सामाजिक संघटना, संस्था मात्र गप्प आहेत तेच गप्प असलेले लोक एरवी शहरात कोणतेही साधकाम जर असेल जस नालीचे काम किंवा इतर कोणतेही काम करायचे असले तर चक्क उभा ठाकून पूर्ण काम करून घेतात आणि गावात उदो उदो करत फिरत असतात मात्र त्यांची देखील या कामात बोलायला हिंमत होताना दिसत नाहीय हे स्पष्ट दिसून येत आहे.

तसेच सर्वसामान्य नागरिकांनी चालू कामाकडे आल्यानंतर एक नागरिक म्हणून असे करा, तसे करा अशी साधी जरी चर्चा केली तर त्याला काही अज्ञात लोक दम देऊन आर रवे ची भाषा करतात आणि त्या ठराविक लोकांचा या कामात कुठल्याही प्रकारचा कवडीचाही संबंध नसताना ते लोक कोण सर्वसामान्य नागरिकांनाही दम देण्याची भाषा करतात असे असल्यामुळे कोणालाही चालू कामात हस्तक्षेप करू देत नाहीत व केला तर दम मात्र नक्की देतात अशी सध्याची परिस्थिती असल्याने सर्वसामान्य ही निघून जाण्याची भूमिका घेतो असल्याने अशी प्रतिक्रिया नागरिकांची येताना दिसत आहे. हे अशेच वातावरण जर दमदाटीचे चालू राहिले तर गुत्तेदार मालामाल धारूरकर बेहाल होईल एवढ मात्र खरंय.

## समाजातील प्रत्येक घटकाला फायदा व्हावा असेच काम संस्थेने केले : माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड | प्रतिनिधी

स्वर्गीय काकूंनी लावलेल्या लहान रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. या वृक्षाच्या छत्रछायेखाली तेव्हापासून हजारो कुटुंबांना आधार मिळाला आणि यापुढे मिळत राहील संस्थेने सर्व जाती धर्माला प्राधान्य दिल्यामुळेच या संस्थेत गुणवंत विद्यार्थी घडले आहेत. सामाजिक बांधिलकी जोपासणारी ही संस्था समाजातील प्रत्येक घटकाला फायदा व्हावा असेच काम करत असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे.

येथील विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील महादेव जाधव यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती तर व्यासपीठावर डॉ.लक्ष्मण जाधव, हरिभाऊ गायकवाड, शिक्षणाधिकारी विक्रम सारूक, नानासाहेब काकडे, हर्षद क्षीरसागर, सुभाष क्षीरसागर, उषाताई सरवदे, विजय सरवदे, सतिष काटे, मकबूलभाई, सुधाकर मिसाळ, एम.बी.सानप, मौलाना काझी महंमद, सहाय्यक प्रशासकिय अधिकारी योगेश पवार, किर्तीताई पांगारकर, इंजि.देशमाने आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात प्रास्ताविक आशा हंडिबाग यांनी केले तर लक्ष्मण जाधव, हरिभाऊ गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले.



यावेळी बोलताना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गेल्या ३५ वर्षे ज्ञानदानाचे काम करून संस्थेत प्रमाणिकपणे काम करणारे जाधव भटक्या विमुक्त समाजात जन्मलेला एक तरूण उच्च शिक्षण घेवून उत्तम काम करू शकतो आणि सेवा करू शकतो असे लोक संस्थेला मिळाले. शिवाजी पाटोळे याने स्व.काकूंपासून सेवा केली. संस्थेने सेवेत घेताना जात-पात, धर्म कधीच बघीतला नाही, गुणवान लोकांना संधी देवून संस्थेने गुणवान विद्यार्थी घडवले. शिक्षणाच्या क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. हे बदल स्वीकारत छोट्या रोपट्याने वटवृक्षात रूपांतर केलं आहे. अनेक अडचणीवर मात करत सामाजिक बांधीलकी जोपासत संस्थेचा प्रत्येक समाज घटकाला फायदा व्हावा असा प्रयत्न राहीला. बीड जिल्हा संवेदनशील जिल्हा आहे. धार्मिक वृत्ती जोपासणात वसा आणि वारसा चालवणारा जिल्हा आहे. यावेळी शाळेचे उप मुख्याध्यापक बेगसर, मुख्य लिपिक सचिन भोज, पर्यवेक्षक अमरापुरकर पर्यवेक्षक प्रा.गाडेकर, प्रा. सिध्देश्वर तसेच सर्व प्राध्यापक शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## चकलांब्यात वाळू तस्करांना पुन्हा दणका

### पोलिसांनी केला २७ लाखांचा मुद्देमाल जप्त

चकलांबा | प्रतिनिधी

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईच्या दिलेल्या आदेशानुसार चकलांब्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी पुन्हा वाळू तस्करांवर कारवाई केली आहे.गोदापात्रात केलेल्या या कारवाईत २७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी चकलांबा-पोलीस ठाण्यात १) विकास संपत केसभात रा. गायकवाड जळगाव, २) मोहम्मद अहमद शेख रा. सुकली रा. शेवगांव जिल्हा अहिल्यानगर अश्या ०२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी मागच्या काही दिवसांत वाळू तस्करांवर मोठ्या कारवाया केल्या आहेत. बुधवारी (दि.२) महारटाकळी येथे नदी पात्रात एक ट्रॅक्टर चोरटी वाळू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पाटील यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना करत कारवायाचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांनी छापा मारला असता यावेळी वाळू तस्करी करणारे टॅक्टर व



एक जेसीबी आढळून आले. त्यानुसार दोन्ही वाहने ठाण्यात आणण्यात आली असून या कारवाईत २७ लाख ३ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, पोलीस उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पोह १५३३ अमोल अंकुश येळे, पोशी -२००४ कैलास विठ्ठल खटाने, पोशी २३१ प्रशांत कल्याण घोंगडे आदींनी केली आहे.

## पाटोद्यात माणुसकीचे दर्शन गाई संकटात, तलाठ्यांनी दाखवली माणुसकी, डॉक्टरांनी वाचवले प्राण

पाटोदा | प्रतिनिधी

गुरूवारी सकाळच्या शांततेत एक आवाज दाटून आला मदतीची हाकेचा. तहसील कार्यालयाच्या आवारात पडलेल्या गाईंच्या करुण अवस्थेनं आज काही मनं हलवून टाकली... आणि मग घडली एक अशी घटना, जी केवळ एक बातमी नव्हे, तर सामाजिक भान आणि तत्परतेचा आदर्श ठरली. सकाळी सहाच्या सुमारास व्यायाम करण्यासाठी बाहेर पडलेले पाटोदा तालुक्यातील तलाठी बाबर साहेब, तलाठी शिवणकर साहेब, पोस्ट कर्मचारी बुधवंत साहेब, व्यापारी सुजित कोल्हे आणि आबा वराडे या मित्र मंडळींनी पाटोदा तहसील कार्यालय आवारात गावरान खिलारी गाई गटांगळ्या खात, जमिनीवर अंथरुणाला खिळलेल्या अवस्थेत पाहिली.



क्षणभर थबकले... पण पुढे गेले नाहीत – ते मित्र थांबले, विचार केला आणि कृती केली. ते म्हणाले, आपण प्रशासनाचा भाग आहोत, पण त्याही आधी माणूस आहोत.त्यांनी तात्काळ पाटोद्यातील पशुवैद्यकीय डॉक्टरांना संपर्क साधला. प्रतिसादही तितकाच झपाट्याचा – डॉ. अण्णा गोरे, डॉ. नरेंद्र जावळे आणि डॉ. हरिदास शेलार व ओम गोरे हे अनुभवी डॉक्टर काहीच वेळात घटनास्थळी दाखल झाले. गाईंची स्थिती तपासून त्यांनी औषधोपचार, सलाईन आणि आवश्यक मदतीची तत्काळ सोय केली. काही वेळातच गाईंची प्रकृती स्थिर झाली आणि त्यांना पुढील निगराणीखाली हलवण्यात आले. ही फक्त एक मदत नव्हती, ती होती एक भूमिका – जाणीवेची आणि जबाबदारीची.

या घटनेतून काही गोष्टी ठळकपणे पुढे येतात: सामाजिक जाणीव: संकटात असलेल्या निराधार जीवांची वेदना ओळखून मदतीचा हात पुढे करणं हीच खरी सामाजिक बांधिलकी.तत्परता: वेळेवर निर्णय घेणं आणि कृतीत उतरवणं – तलाठी व डॉक्टर मंडळींनी हे उत्तम दाखवून दिलं.सामूहिक जबाबदारी: प्रशासन, नागरिक आणि सेवाभावी वृत्ती यांचं योग्य मिश्रण हेच समाजाचं खऱ्या अर्थानं बळ आहे. आज पाटोद्यात गाई वाचली... पण त्याच वेळी एक गोष्ट पुन्हा अधोरेखित झाली माणुसकी अजूनही श्वास घेत आहे... आणि ती इथे, आपल्या पाटोदा गावात जिवंत आहे.

## अवघ्या महाराष्ट्रात बेकायदेशीर अतिक्रमण हटाव मोहीम शासन राबवत असून तलवाडा महाराष्ट्रात नाही का?

■ शासनाचे नियम वेशीला टांगून तलवाडा ग्रामपंचायत तत्कालीन ग्रामविकास अधिकारी यांनी चक्क नावावर पीटीआर देऊन टाकला ■ आर्थिक तडजोडी पाई कारवाई टाळली जाते का? अतिक्रमण शेकडो जनाचे नोटीस फक्त एकाला

तलवाडा | प्रतिनिधी

मागील चार ते साडेचार वर्षापासून तलवाडा ग्रामपंचायत च्या अनागोंदी कारभारामुळे तालुक्यात चर्चेत आणलेली तलवाडा ग्रामपंचायत ही आजही वादाच्या भोवऱ्यात असून अतिक्रमणाच्या मुद्द्याचे पुन्हा एकदा चर्चेचा विषयी बनली आहे. यातच अतिक्रमित सरकारी जागेवर पिटीआर नक्कलमध्ये मालकीच्या रकान्यात नाव देऊन सरकारी जागा आर्थिक देवान घेऊन नावावर लावून दिल्याचे दिले असल्याचे समोर येत आहे. यामध्ये तत्कालीन ग्रामसेवक आणि कर्मचारी यांनी मोठा आर्थिक मलिदा लाटला असल्याची चर्चा असून वरिष्ठ अधिकारी गप्पा का होते असा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे या आर्थिक तडजोडीत पंचायत स्तरावरील अधिकारी ही सामील आहेत का ? त्यांनी ग्रामपंचायत च्या अनागोंदी कारभाराकडे कानाडोळा का केला ? असे एक ना अनेक प्रश्न जनतेमधील चर्चेचा विषय बनला असून रेकॉर्ड ची तपासणी केली तर असे अनेक प्रकरणे बाहेर येतील अशीही चर्चा आहे.

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत चा कारभार हा मागील चार वर्षांपासून अनागोंदी आणि अनियमित पने सुरू आहे. याबाबत मागील काळात



अनेक तक्रारी ही झाल्या आहेत. आणि अनेक तक्रारी पेंडिग आहेत काही प्रकरणे वरिष्ठ पातळीवर आहेत याकडे अधिकारी यांनी वेळीच लक्ष देऊन कार्यवाही करणे गरजेचे होते जेणेकरून ग्रामपंचायत च्या कारभाराला आळा बसला असता परंतु दुर्लक्ष केल्यामुळे या कारभारात वाढ होत गेली आणि अनेक प्रकरणे बोगस करण्यात आली. मोठी आर्थिक देवाण घेवाण करत चक्क सरकारी जागेवर भोगवाट्यात नाव लावण्याचे नियम असताना मालकीत नाव लावण्याचा प्रताप केला आहे. यासारखे अनेक प्रकरणे झाले असून कामे नकारताच अनेक बिले उचलण्यात आलेली आहेत. याला जबाबदार असणारे अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर वरिष्ठ अधिकारी कार्यवाही करतील का ? असा प्रश्न सध्या उपस्थित होत असून आता नव्याने अतिक्रमणाचा मुद्दा समोर आल्याने पुन्हा एकदा ग्रामपंचायतचा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला असल्याने पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यावर काय चौकशी करून कार्यवाही करतात हे पहावे लागेल.

शेकडोजनाचे अतिक्रमण बेकायदेशीर रित्या असून नोटीस फक्त चव्हाणवाडी येथील सुळे नावाच्या व्यक्तीला देण्यात आली असून बाकीच्यांना नोटीस का देण्यात आली नाही? आर्थिक तडजोडीतून नोटीसा थांबवल्या का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

गावातीलच सार्वजनिक बारव ते सरकारी दवाखाना पर्यंत मोठ्या प्रमाणात बेकायदेशीररित्या गावाची तहान भागवणारा गाव तलाव हा तीनशे ते चारशे एकरापर्यंत असून गावाला या तलावापासून सौंदर्य प्राप्त झाले ज्या तलावामध्ये पावसातील पाण्याचा मोठ्या प्रमाणात साठा जमा होतो तलावाच्या रक्षणासाठी मातीचे टेकडी असुन ही टेकडी कोरून काही लोकांनी धोका निर्माण केला असून त्या ठिकाणी दुकाने मांडली असून तर तत्कालीन ग्राम विकास अधिकारी यांनी सरकारी नावाच्या जमिनी थेट नावावरच केले असून या मध्ये पैशाची मोठ्या प्रमाणात आर्थिक तडजोड झालेली असल्याची बोलले जात असून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने संबंधित विभागाला पत्र देखील देण्यात आलेले असून आत्तापर्यंत कसलीच कारवाई झालेली नाही ज्या ठिकाणी अतिक्रमण केले आहे. त्याच्या खालीच पाण्याची पाईप लाईन गेली असून लिकेज झाल्यास मोठी अडचण निर्माण होऊ शकते अशा अतिक्रमणामुळे माती ढासळली असून सिमेंट रस्त्यावरच चिखल निर्माण झालेला आहे हे अतिक्रमण न उठल्यास गावातील ग्रामस्थांकडून लवकरच आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT